**नि.दि.दावा क. ६५/२०१५**
**रामभाउ वि. नारायण**

## आदेश नि.क.२१ वर
(पारीत दि.२१.६.१६)

१. प्रतिवादीने सदरचा अर्ज विना लेखी जवाबाचा आदेश रद्द करुन त्याचे लेखी बयान पेश करण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत केलेला आहे.

२. वादीने सदरच्या अर्जाला उत्तर देवुन विरोध नोंदवला आहे. उभयपक्षांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींचे वकील श्री पाटील यांनी असा युक्तिवाद केला की,प्रतिवादी हा ७५ वर्ष वयाचा वृद्ध असुन त्याचा मुलगा बाहेरगावी नौकरीला आहे. प्रतिवादीला त्याच्या म्हातारपणामुळे येणे जाणे जमत नाही आणि डोळयाने बरोबर दिसत नाही तसेच वयोमानानुसार त्यांची प्रकृती बरी राहत नाही. त्याला दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर मुलाच्या मार्फत ॲड. गायकवाड आणि त्यानंतर ॲड. लिखिते यांची मुलाच्या मार्फत नियुक्ती केली होती. परंतु, ते दोनही वकील नागपूरला राहत असल्याने प्रतिवादीला त्यांच्याकडे जाणे येणे जमले नाही आणि त्यानंतर दि. २७.१.१६ पासुन वकीलांनी मिळुन न्यायालयीन कामकाजावर असहकार पुकारल्यामुळे एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत त्याला त्याचे लेखी बयान न्यायालयात पेश करता आले नाही. तसेच एप्रिल २०१६ मध्ये त्याची प्रकृती बिघडली आणि तो एक महिना उपचार घेत राहीला. दरम्यानच्या काळात मे महिन्यात दिवाणी न्यायालयाला सुट्टया होत्या. त्यानंतर त्याने दुस-या वकीलामार्फत दि. ९.६.१६ रोजी चौकशी केली असता त्याला दि. १४.३.१६ च्या आदेश झाल्याचे व पुढील पेशी तारीख २१.६.१६ असल्याचे समजले. त्यानंतर त्याने नविन वकील नियुक्त करुन सदरच्या अर्जासह लेखी बयान न्यायालयात दि. १४.६.१६ रोजी पेश केले.

३. प्रतिवादीने लेखी बयान सादर करण्यास जाणुनबुजून विलंब केलेला नाही. त्याची केस गुणवत्तेच्या दृष्टीने चांगली असुन त्याला लेखी बयान सादर करण्यास परवानगी न दिल्यास त्याच्यावर अन्याय होईल. त्यामुळे दि. १४.३.१६

रोजीचा आदेश रद्द होवुन त्याला लेखी बयान सादर करण्याची परवानगी देण्यात यावी. याउलट, वादीचे वकील श्री मांडवकर यांनी अर्जाला विरोध करत असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने अर्जात नमुद केलेली सर्व कारणं आदेश रद्द करण्यासाठी पुरेशी नाही. ॲड. गायकवाड आणि ॲड लिखिते आठवडयातुन दोन दिवस उमरेडला नियमितपणे येतात आणि प्रतिवादीचा मुलगा हा सुशिक्षित आणि नौकरीत असल्याने तो प्रतिवादीच्या वतीने कामकाज पाहत होता अश्या परिस्थितीत प्रतिवादीने त्या वकीलांची भेट घेणे जमले नाही असे सांगुन उचित ठरत नाही. सदरच्या खटल्यात वादीची साक्ष सुद्धा नोंदवलेली आहे. प्रतिवादीला समन्स मिळाल्यानंतर त्याने सदरचे लेखी बयान ६ महिन्यांनी दाखल केलेले आहे आणि विलंबाचा कालावधी पाहता त्याने अर्जात नमुद केलेली कारणे पुरेशी ठरत नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. खटल्याच्या अभिलेखावरुन प्रतिवादीला दाव्याचे समन १४.१२.१५ रोजी मिळाले होते असे दिसुन येते. त्याने शपथेवर दिलेल्या अर्जानुसार आणि दाव्यातुन त्याचे वय ७५ वर्षाचे दिसत असल्याने तो वयोवृद्ध असल्याचे देखील स्पष्ट होते. दि. २७.१.१६ पासुन एप्रिल महिन्याच्या पहील्या आठवडयापर्यंत उमरेउ येथील वकीलांनी न्यायालयीन कामकाज बंद ठेवले होते हा बाबीची दखल न्यायालय स्वत: घेत आहे. तसेच ५ मे ते ५ जुन या कालावधीत दिवाणी न्यायालयाला उन्हाळी रजा होत्या. त्यामुळे या कालावधीत प्रतिवादीला त्याचे लेखी बयान सादर करता आले नाही या त्याच्या म्हणणयात तथ्य आढळुन येते. प्रतिवादीने तो एप्रिल १६ मध्ये आजारी पडला व एक महिना उपचार घेतला या त्याच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वैद्यकीय प्रमाणपत्र दि. १५.५.१६ चे प्रकरणात दाखल केलेले आहे. त्याचे वय लक्षात घेता त्याची प्रकृतीचे कारण सुद्धा अवास्तव वाटत नाही किंवा त्याने सांगितलेले कारण खोटे आहे असे देखील म्हणता येत नाही.

५. न्यायालयाच्या उन्हाळी रजा संपुन दिवाणी न्यायालयाचे कामकाज ६ जुन पासुन सुरु झाल्यानंतर प्रकरण ९.६.१६ रोजी न्यायालया समोर पहिल्यांदा

आले व त्यादिवशी वादीची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर लगेच दि. १४.६.१६ रोजी प्रतिवादीने प्रकरण बोर्डावर घेवुन प्रस्तुतचा अर्ज लेखी बयानासह सादर केला. यावरुन प्रतिवादी हा सदर खटला चालविण्यास उत्सुक असल्याचे दिसुन येते आणि त्याने लेखी बयान सादर करण्यास मुद्दाम टाळाटाळ केल्याचे दिसुन येत नाही. अश्या परिस्थितीत प्रतिवादीवर कुठलाही अन्याय होवु नये म्हणुन न्यायाच्या दृष्टीने दि. १४.३.१६ चा त्याच्या विरुद्ध झालेला विना लेखी जवाबाचा आदेश रद्द करणे व त्याला लेखी बयान सादर करण्याची परवानगी देणे या न्यायालयाच्या मते उचित ठरते.

६. सबब प्रतिवादीचा अर्ज **रुपये २०००/- खर्चासह मंजुर** करण्यात येत आहे.

७. प्रतिवादीने पुढील तारखेपुर्वी किंवा तारखेवर न चुकता खर्चाची रक्कम रुपये २०००/- न चुकता जमा करावी.

उमरेड.
दि. २१.६.१६

( कु. व.रा.जांभुळे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
उमरेड.